**फाईट बॅक: दुर्घटना से एक्झिक्यूशन भला! (1140)**

एका शेतामध्ये एका सशाचं घर होतं. दररोज ससा अन्न शोधायला बाहेर जायचा आणि त्याच्या मागे घरामध्ये म्हणजे बिळामध्ये त्याची लहान पिल्लं दिवसभर एकटी असायची. एका संध्याकाळी जेव्हा ससा अन्न घेऊन बिळामध्ये पोहोचला तेव्हा त्याची लहान पिल्लं खूप घाबरलेली होती. हडबडत, हडबडत ती सशाला म्हणाली की 'अहो बाबा आज आम्ही बांधावरती शेतकऱ्याचं बोलणं ऐकलं. तो दुसऱ्याला सांगत होता की हे शेत आता एकदा नांगरुन टाकायला हवं. आणि जर त्यानं हे शेत नांगरलं तर आपलं हे सगळं घर उध्वस्त होणार. मग आपणं कुठं राहायचं? आपलं कसं होणार?' हे ऐकून ससा ही एक मिनिट थबकला. पण मोठ्या धीरानं त्यानं पिल्लांना सांगितलं की 'काळजी करु नका. तसं लगेच काही होणार नाही. मी पहातो काय करायचं ते.' पिल्लं शांतपणे झोपी गेली. पण ससा मात्र रात्रभर काही विचार करत होता.

पुढे दोन चार दिवस असेच गेले. एका संध्याकाळी पुन्हा पिल्लांनी सश्याला सांगितलं की 'आज शेतकऱ्यानं त्याच्या नोकराला शेत नांगरुन टाकायला सांगितलं आहे. आता ते नक्की शेत नांगरणार. बाबा आता आपण कुठं जायचं? आम्हाला खूप भीती वाटत आहे' त्यावर मिश्किल हास्य करत ससा म्हणाला 'बाळांनो घाबरु नका. अजून दोन चार दिवस तरी लगेच शेतकरी काही शेत नांगरणार नाही.' हे ऐकून पिल्लांना आश्चर्य वाटलं की 'आपलं घर जायची वेळ आली तरी बाबा एवढे शांत कसे?' तेव्हा सशाने; तो तयार करत असलेला एक नवा रस्ता पिल्लांना दाखवला आणि म्हणाला 'बाळांनो जर मी नसताना तुम्हाला काही धोका जाणवला तर तुम्ही या मार्गानी पुढे जा. तिथे आपण दुसरं बीळ तयार करतो आहोत. तर ह्या रस्त्याने तुम्ही सुरक्षित पणे तिकडे जाऊ शकता. हा... अजून ते नवं बिळ पूर्ण व्हायचं आहे. पण शेतकरी नांगरणी करेल त्या आधी येत्या दोन चार दिवसात नवं घर तयार होईलच.' हे ऐकून पिल्लांना हायसं वाटलं.

नंतर परत एके दिवशी पिल्लांनी सशाला बातमी दिली की 'आज आम्ही शेतकऱ्याचं बोलणं ऐकलं. तो नोकराला सांगत होता की उद्या बरोबर तांबडं फुटायच्या वेळेला तू ये. मी पण तांबडं फुटायच्या आधीच आलेलो असेन. म्हणजे उद्या सकाळी सकाळी सगळं शेत नांगरुन टाकू.' तेव्हा मात्र सशानं बरोबर ताडलं कि 'आता उद्या मात्र शेतकरी शेत नक्की नांगरणार.' मग कोणत्याही क्षणाचा विलंब न करता, सशाने आणि पिल्लांनी लगोलग त्यांचं राहतं घर आवरलं, सामानाची बांधाबांध केली आणि नव्या रस्त्याने ते त्यांच्या नव्या बिळामध्ये राहायला गेले. आता सशाची पिल्लं नव्या घरात अधिक खूष आणि सुरक्षित होती.

ससा, पिल्ले आणि घराच्या या गोष्टीमध्ये एक मजेशीर भाग असा आहे की पहिल्या दोन्ही वेळेला शेतकऱ्यानं जरी शेत नांगरण्याचं ठरवलं होतं तरी सशाच्या लक्षात आलं होतं की नांगरट काही लगेच होणार नाही. पण तिसऱ्या वेळेला मात्र जेव्हा शेतकऱ्यानं नांगरणीची बरोबर वेळ नोकराला सांगितली म्हणजेच शेतकऱ्यानं त्याच्या नांगरण्याच्या कामाची ठळक रुपरेषा ठरवली अर्थात नांगरणी चं परफेक्ट शेड्युल तयार केलं तेव्हा मात्र सश्याची खात्री पटली की आता उद्या मात्र शेतकरी नक्की नांगरणी करणार. आणि झालं ही तसंच. ठरल्या प्रमाणं शेतकऱ्यानी दुसऱ्या दिवशी शेत नांगरलं सुद्धा!

खरेतर या गोष्टीवरुन 'एक्झिक्युशन' अर्थात 'अंमलबजावणी' चे महत्व अधोरेखीत होते. शेतकरी आणि ससा, दोघांनीही त्यांना गरजेच्या गोष्टी 'एक्झिक्यूट' केल्या म्हणजे वास्तविक अमलात आणल्या तेव्हा त्या झाल्या. 'एक्झिक्यूट' केल्याच नसत्या तर काय झाले असते? तर लक्षात ठेवा बिझनेस मध्ये सुद्धा 'लक्ष्य असो वा आव्हान 'एक्झिक्युशनच' मोठे तारणहार ठरते' तेव्हा आजचा 'फाईट बॅक' 'बिझनेस एक्झिक्युशन' विषयी!

कोणत्याही 'एक्झिक्यूशन' मध्ये चार गोष्टींचा अंतर्भाव करण्याची गरज असते. 1.प्लॅन, 2. शेड्युल, 3.ॲक्च्युअल एक्झिक्युशन, आणि 4.फीडबॅक. प्लॅन म्हणजे योजना, आराखडा किंवा रुपरेषा! उदाहरणार्थ. समजा की 'आपल्या दुकानामध्ये नेहमी फिजिकल स्टॉक टेकिंग झालं पाहिजे' असं आपण ठरवलं तर 'दर महिन्यातून एकदा' किंवा 'दर पंधरा दिवसातुन एकदा' सर्व दुकानाचं फिजिकल स्टॉक टेकिंग झालं पाहिजे हा झाला प्लॅन! मग '1 तारखेला बँगलचं, 2 तारखेला नेकलेसचं, 3 तारखेला सिल्वर च्या ताटांचं, फिजिकल स्टॉक टेकिंग करायचं ठरवून, ज्या त्या काउंटर सुपरवायझर ला ह्या ठरवलेल्या तारखांची माहिती पोहोचवणं' हे झालं आपल्या प्लॅन चं शेड्युल! त्यानंतर येते 'ॲक्च्युअल एक्झिक्युशन' म्हणजे फिजिकल स्टॉक टेकिंग चे हे जे

कॅलेंडर आणि कोणी करायचे हे ठरले आहे त्या तारखे प्रमाणे संबंधीत जबाबदार व्यक्तीने वास्तविक स्वरुपात जो तो फिजिकली स्टॉक घेणे. पुढे अॅक्च्युअल एक्झिक्युशन नंतर येतो तो फिडबॅक. म्हणजे 'फिजिकल स्टॉक टेकिंग करताना काही डिस्क्रिबंसी आढळलया किंवा फिजिकल स्टॉक बरोबर मॅच झाला कि नाही याचा फीडबॅक अप्रोप्रिएट अर्थात योग्य व्यक्ती पर्यंत पोहोचवणे.

एकंदरीतच काय तर 'बिझनेस एक्झिक्युशन' मध्ये केवळ एखादीच गोष्ट करण्याकडे लक्ष न देता; प्लॅन, शेड्युल, अॅक्च्युअल एक्झिक्युशन आणि फीडबॅक या चारही गोष्टींकडे लक्ष देण्याची गरज असते. आणि लक्षात ठेवा असे हे '4 ही गोष्टींनी परिपूर्ण एक्झिक्युशन' हेच आपल्या बिजनेस मधील सर्वात महत्त्वाचा भाग ठरत असते. मागे आपण बघितलं आहे की 'बिझनेस ग्रो करण्यासाठी आपल्याकडे व्हिजन असायला हवी'. त्या व्हीजन साठी आपल्याकडे चांगली स्टॅटर्जी असायला हवी. त्यासाठी मार्केट, कस्टमर, प्रॉडक्ट यांचा अभ्यास करुन आपण नीड, वॉट, डिझायर्स फाईंड आऊट करायला हव्यात. आणि त्या वरुन आपली कॉर्पोरेट स्टॅटर्जी, बिझनेस स्टॅटर्जी, फंक्शनल किंवा ऑपरेशनल स्टॅटर्जी आणि कॉम्पिटिटिव्ह स्टॅटर्जी अशा स्टॅटर्जीज डेव्हलप करायला हव्यात. हा.... पण नुसत्या स्टॅटर्जीज डेव्हलप करुन उपयोग होत नाही तर त्याचं एक्झिक्युशन ही तितक्याच ताकदीनं करायला हवं. कारण 'केल्यानेच होतं' हा कानमंत्र सर्वच बाबतीत लागू होतो.

'In Search of Excellence' हे पुस्तक लिहिणारे टॉम पीटर यांचे सुंदर वाक्य आहे. 'The thing that keeps a business ahead of the competition is the excellence in execution.' म्हणजे 'व्यावसायिक स्पर्धे मध्ये आपल्या व्यवसायाला पुढे ठेवणारी गोष्ट म्हणजे अंमलबजावणीतील उत्कृष्टता.' एक मोठे इन्वेस्टर आणि बिझनेस लीडर जॉन डिअर असं म्हणतात की 'Execution is the king'. म्हणजे बिजनेस मध्ये एक्झिक्युशन च सर्वात महत्त्वाचं असतं. 'Ideation without execution is delusion' म्हणजे 'अंमलबजावणीशिवाय कल्पना हा एक भ्रम आहे' असा हि एक्झिक्युशन बाबत एक नवा विचार जगप्रसिद्ध मोटिवेशनल स्पीकर रॉबिन शर्मा यांनी दिलेला आहे. म्हणूनच आपण जबाबदारीने हे लक्षात ठेवायला हवं की 'एक्झिक्युशन हाच बिजनेस मधला सर्वात महत्त्वाचा एस्पेक्ट आहे, जो आपली स्टॅटर्जी एक्झिक्युट करण्यासाठी, वास्तविक अस्तित्वात आणण्यासाठी आणि लीड मिळवण्यासाठी उपयोगी ठरतो.

आता; 'आपल्याला एक्झिक्युशन उत्कृष्ट पद्धतीने फ्लॉ लेस करायचं असेल', तर त्यातील काही महत्त्वाच्या गोष्टींची आपण थोडक्यात चर्चा करुया. पहिले म्हणजे एक्झिक्युशन करताना आपल्याला स्वत:ला क्लॅरिटी ऑफ प्लॅन अर्थात स्पष्टता असायला हवी आणि त्याचं प्रॉपर कम्युनिकेशन कंपनीतल्या सगळ्या लोकांना असायला हवं. याबाबत 'हार्वर्ड बिजनेस रिव्ह्यू' चा एक रिसर्च पेपर आहे. त्यामध्ये त्यांनी असं आयडेंटिफाय केलेलं आहे की 'ज्या बिजनेसेस मध्ये एक्झिक्युशन हे उत्कृष्ट होतं त्या बिजनेसेस मध्ये 80% पेक्षा जास्त एम्प्लॉयीजना आपली रिस्पॉन्सिबिलिटी आणि आपल्याला काय अॅक्शन्स करायला हव्यात, काय डिसीजन्स घ्यायला हवेत याची पूर्ण कल्पना असते. आणि अशी इन्फर्मेशन, ऑर्गनायझेशन मध्ये जर प्रॉपर्ली फ्लो होत असेल तर आणि तरच आपण चांगले एक्झिक्युशन करु शकतो.'याचाच अर्थ काय तर एक्झिक्युशन मध्ये ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट म्हणजे HR चा मोठा वाटा असतो. आपण आपल्या एम्प्लॉईज ना कशा पद्धतीने मोटिवेट करतो यावर आपलं एक्झिक्युशन मोठ्या प्रमाणात अवलंबून असतं. याच बरोबर एक्झिक्युशन मध्ये आपल्या ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चर चा ही महत्वाचा वाटा असतो. ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चर म्हणजे आपल्या कडे असणाऱ्या प्रत्येक डेसिग्नेशन साठीचे रोल्स, रिस्पॉन्सिबिलिटीज आणि त्याचप्रमाणे कामे करण्याची वेल डीफाईनड पद्धती म्हणजे SOPs (Standard Operating Procedures) महत्त्वाच्या ठरतात. या शिवाय 'छोटे छोटे प्रोजेक्ट करताना प्रोजेक्ट प्लॅनिंग करण्याची क्षमता' ही सुद्धा एक्झिक्युशन मध्ये फार महत्त्वाचा रोल प्ले करत असते. पुढे जाता आपण जे काही एक्झिक्युशन करत असतो त्यासाठी सततचे रिव्ह्यू मेकॅनिझम ही आपल्याला डेव्हलप करावे लागते. तरच आपलं एक्झिक्युशन सक्सेसफुल होऊ शकतं. अर्थात HR, ऑर्गनायझेशनल स्ट्रक्चर, आणि रिव्ह्यू मेकॅनिझम हे देखील एक्झिक्युशन मधील महत्त्वाचे भाग आहेत.

लेखाच्या शेवटी जे. आर. डी. टाटा यांनी सांगितलेली एक छोटीशी गोष्ट आपण पाहूयात. ते ही असंच म्हणतात की 'आपण पेपर वर जे काही लिहीत असतो, खरंतर त्यापेक्षा सुद्धा एक्झिक्युशन अर्थात अंमलबजावणी हीच सगळ्यात महत्त्वाची ठरते जी काऊंट होत असते'. यासाठी त्यांनी एक सुंदर उदाहरण सुद्धा दिलेले आहे. ते म्हणतात की 'आपल्या ताटात काय अन्न आहे किंवा आपण काय खाल्लं आहे हे महत्त्वाचं नाही आहे, तर आपल्याला न्यूट्रिशन्स मिळून शारीरिक दृष्टया उत्तम वाढायचं असेल तर खाल्लेलया अन्नाचे आपण किती चांगले पचन करतो हे जास्त महत्त्वाचं आहे.'

म्हणजेच काय तर आपल्या बिजनेस च्या ग्रोथ साठी 'एक्झिक्युशन अर्थात अंमलबजावणी' च तारणहार ठरते! नाहीतर व्यवसायात होणारे नाहक नुकसान किंवा व्यवसायात मागे पडणे हे एखाद्या दुर्घटने सारखेच तर आहे. म्हणूनच सांगतो 'दुर्घटना से एक्झिक्यूशन भला!'